सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: सीएमए-०४२१/सीआर-०१/२०२१/जाहिरात दिनांक : ०३ जानेवारी, २०२२.

# -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :- परीक्षांच्या सुधारित दिनांकाबाबत.**

**संदर्भ** :- (१) आयोगाचे क्रमांक एनओटी-३६१७/सीआर२४/२०२०/जाहिरात दिनांक २७ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे प्रसिद्धीपत्रक

(२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजीचे प्रसिद्धीपत्रक

कोरोना विषाणुच्या पार्श्वभुमीवर शासकीय सेवेत सरळ सेवेने नियुक्तीकरीता जाहिराती प्रसिद्ध झाल्या नसल्यामुळे कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारास परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या-१२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अन्वये शासनाकडून घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने आयोगामार्फत दिनांक ०२ जानेवारी, २०२२ रोजी नियोजित राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२१ पुढे ढकलण्यात येऊन संबंधित वयाधिक उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय आयोगाकडून दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे घेण्यात आला होता. तसेच परीक्षेचा सुधारित दिनांक स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले होते.

**२.** उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने आयोगामार्फत आयोजित पुढील परीक्षा त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास घेण्यात येतील :-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | परीक्षा | यापूर्वी निश्चित केलेला दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | १०६/२०२१ | राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२१ | ०२ जानेवारी, २०२२ | २३ जानेवारी, २०२२ |
| २ | -- | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा २०२० संयुक्त पेपर क्रमांक १ | २२ जानेवारी, २०२२ | २९ जानेवारी, २०२२ |
| ३ | २६०/२०२१ | महाराष्ट्र दुय्यम सेवा मुख्य परीक्षा २०२० पेपर क्रमांक २, पोलीस उपनिरीक्षक | २९ जानेवारी, २०२२ | ३० जानेवारी, २०२२ |

**३.** कोरोना विषाणु च्या प्रादुर्भावाच्या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना लक्षात घेऊन परीक्षेच्या आयोजनाच्या अनुषंगाने आयोगाकडून आढावा घेण्यात येईल. तसेच याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याकरीता आयोगाच्या संकेतस्थळाचे नियमित अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग